१०-ऑगस्ट २०१४

रक्षाबंधन
नारळीपौर्णिमा



॥श्री॥

# वैराग्यशतक

- राजा भर्तृहरी

संस्कृत वाङ्मयात नीतिशतक, शृंगारशतक आणि वैराग्यशतक अशी तीन शतके प्रसिद्ध आहेत. यांना सामान्यत: शतक असे म्हटले जात असले तरी त्यातील श्लोकसंख्या नेमकी शंभरच असेल असे नाही. ती कमी-जास्त ही असू शकते. मात्र वैराग्य-शतकातील श्लोकसंख्या बरोबर शंभर आहे.

या तिन्ही शतकांचा रचयिता भर्तृहरी आहे. या कवीचा निश्चित कालखंड सांगता येणे कठीण आहे. तरीदेखील अनेकांच्या मते इसवी सनाच्या पहिल्या शतकात म्हणजे सुमारे २ हजार वर्षांपूर्वी तो होऊन गेला असावा. तर काहींच्या मते तो कालिदासाचा समकालीन होता. या भर्तृहरीसंबंधी अनेक दंतकथा किंवा आख्यायिका सांगितल्या जातात.

भर्तृहरि हा विवेकसंपन्न असा राजा होता. तो स्वत: कवी होता व योगी सुद्धा होता. शककर्ता विक्रमादित्य याचा तो थोरला भाऊ होता. या विक्रमादित्याच्या पदरी कालिदास, अमरसिंह यासारखी नवरत्ने होती. भर्तृहरीला विक्रमादित्य व सुभटवीर्य असे दोन धाकटे भाऊ व मैनावती नावाची बहिण होती. त्याच्या वडिलांचे नाव वीरसेन व आईचे नाव सुशीला असे होते. मगध देशाची राजकन्या - पद्माक्षी हिच्याबरोबर त्याचा विवाह झाला होता. हा भर्तृहरी उत्तम राज्यकारभार करणारा, न्यायी राजा होता. प्रजेचे त्याच्यावर व त्याचे प्रजेवर अत्यंत प्रेम होते. परंतु त्याच्या आयुष्यात असा काही प्रसंग घडला की त्याने आपले सर्व राज्य आपला धाकटा भाऊ विक्रमादित्य याच्या स्वाधीन केले व



© www.madhaveeraghuveer.com

तो स्वत: विरक्त जीवन जगू लागला.

राजा भर्तृहरीला एका ब्राह्मणाने एक फळ दिले. चिरतारुण्य देणारे असे ते फळ होते. ते अपूर्व असे फळ राजाने आपली प्रिय पत्नी पद्माक्षी राणीला दिले. कारण पद्माक्षी त्याला प्राणापेक्षा प्रिय होती. परंतु पद्माक्षीचा प्रियकर वेगळाच होता. त्या लाडक्या प्रियकराला राणीने ते फळ दिले. पण त्याचे दुसऱ्याच एका वारयोषितेवर किंवा नर्तिकीवर प्रेम होते. त्याने तिला ते फळ दिले. त्या नर्तिकीचा जीव एका ब्राह्मणावर जडला होता. म्हणून तिने ते फळ त्या ब्राह्मणाला दिले. तोच हा ब्राह्मण ज्याने हे फळ राजा भर्तृहरीला नजर केले होते.

आपण राजाला भेट म्हणून दिलेले फळ पुन्हा आपल्याकडेच आले हे पाहून त्याला अतोनात आश्चर्य वाटले. त्याने राजाला याचा खुलासा विचारला तेव्हा या फळाचा प्रवास राजा भर्तृहरीला समजला. स्त्री जातीच्या स्वभावाचा व स्त्रियांच्या चंचल मनाचा त्याला प्रत्यक्ष अनुभव आला त्याच्यामुळे त्याचा जीव प्रपंचाला विटला. प्राणप्रिय अशा आपल्या राणीनेच आपली फसवणूक केली हे समजल्यावर त्याच्या मनात वैराग्य उत्पन्न झाले. त्याने आपले सर्व राज्य आपला भाऊ विक्रमादित्य याला दिले व योगसाधना करण्यासाठी तो रानात निघून गेला

या शतकत्रयाच्या सर्वच हस्तलिखितात राजाचा उल्लेख राजर्षी, भूपती, महाकवी, चक्रचूडामणी, योगेंद्र व महायोगी असा आढळतो. भर्तृहरी एक की अनेक असा वादही काहीजण घालतात. काही जण भट्टी कवी आणि भर्तृहरी एकच असेही मानतात. काहींच्या मते भर्तृहरी बौद्ध धर्मीय होता. भर्तृहरीच्या

तीनही शतकांमध्ये विष्णूचे व शंकराचे माहात्म्य वर्णन केलेले आहे. त्याच्या अनेक श्लोकांमध्ये अवतार, कल्पना, स्वर्ग, युग, प्रलय यांचा उल्लेख आढळतो. या सर्वच श्लोकांची रचना अलंकारिक, प्रासादिक आणि छंदोबद्ध आहे. त्यावरून भर्तृहरींच्या साहित्य शास्त्राच्या अभ्यासातील प्रगल्भता ठळकपणे दिसून येते. मानवी स्वभावाचे अनेक पैलू त्यांनी समर्पकरीत्या मांडले आहेत.

हे वैराग्यशतक त्याने वयाच्या उतरत्या काळात रचले असावे. वृद्धपणीच माणसाचे मन वैराग्याकडे झुकू लागते. वैराग्याचा जोर तेव्हाच प्रबळ होतो. मात्र तो राजा असताना त्याने विलासाचा भरपूर उपभोग घेतला असावा. परंतु त्यानंही त्याने मानवी मूल्यांचे महत्व त्याने मोठ्या कौशल्याने दाखवून दिले आहे. सन्मार्गाचे आचरण, परोपकाराची वृत्ती, धैर्य, दातृत्व अशा समाजोपयोगी उत्कृष्ट काव्यगुणांची ओळख त्याने आपल्या काव्यरचनेद्वारे करून दिली आहे. भर्तृहरीने नेहमीच मानवी मूल्याला व नीतिमत्तेलाच प्राधान्य दिले आहे.

शृंगारशतक ज्या भर्तृहरीने लिहिले त्याने स्वतः राजा असताना विलासाचा उपभोग घेतला त्याच भर्तृहरीने वैराग्यशतकही रचले हा वरवर पहाता विरोधाभास वाटत असला तरी खरी परिस्थिती तशी नाही. उलट त्या त्या वयानुसार किंवा वर्ण व आश्रमानुसार आचरण करणे यात काहीच गैर नाही. आणि भर्तृहरीचा जो वैराग्यभाव आहे तो मानवी जीवनाची इतिकर्तव्यता दाखवणारा भाव आहे. वैराग्यामध्ये दातृत्वाला विशेष प्राधान्य आहे. जे जे जवळ असेल त्यावरील आपली मालकी सोडण्याचे मोठे कार्य वैराग्य करते हे भर्तृहरीने दाखवून दिले आहे.

©www.madhaveeruchiveer.com

वैराग्यशील मन हा कृतार्थ जीवनाचा पूर्णविराम आहे.

एकाच वेळी राजा, कवि व योगी या तीनही विशेषणांनी भर्तृहरी संबोधला गेला आहे. त्याने आपल्या आयुष्यात विलास, नीतिमत्ता आणि वैराग्य या तीनही गोष्टींचा अनुभव घेतला आहे. आणि म्हणूनच या तीनही शतकातील श्लोकांना प्रचीतिचा स्पर्श झालेला आहे आणि याच कारणाने भर्तृहरीचे अनेक श्लोक सुभाषितमय झाले आहेत. काव्यगुणांनी पुरेपूर भरलेली अशी ही तीनही शतके आहेत. त्याचा मनावर ठसणारा अर्थवाही परिणाम जनमानसावर करतोच परंतु रचनासौंदर्याच्या दृष्टीने हे शतकत्रय म्हणजे संस्कृत भाषेचा अलंकारच आहे.

संस्कृत भाषेच्या अभ्यासकांना सतत खुणावणारी ही तीन शतके आहेत. साहजिकच अभ्यासकांनी अनेक भाषांमध्ये याचे अनुवाद केले आहेत. याचे मराठी भाषांतर दत्तात्रय गजानन देव यांनी १८९१ मध्ये केले आहे. ते आज उपलब्ध आहे. याशिवाय वामनपंडितांनी केलेले समश्लोकी भाषांतरही लोकप्रिय आहे. वृत्त व छंद समान ठेवून ही रचना केली आहे.

☆ भर्तृहरीच्या शृंगारशतकातही वैराग्याची छटा आहेच. सृष्टी जशी वेगवेगळ्या ऋतुंमध्ये वेगळेच सौंदर्य धारण करते तसेच माणसाने वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत, शिशिर या वेगवेगळ्या ऋतूतील अनुपम अशा सृष्टीसौंदर्याचा आस्वाद घ्यावा. त्यातूनच जीवनातील आनंद व उत्साह वाढत असतो. शृंगारपर रचना करत असताना भर्तृहरी वैराग्य व अध्यात्म यांना विसरलेला नाही. खरेखुरे समाधान मिळवण्याचे दोन मार्ग असतात. आपापल्या आवडीनुसार प्रत्येकजण मार्ग निवडत असतो. शृंगार आणि वैराग्य यापैकी ज्याला जे आवडेल ते त्याने स्वीकारावे.



© www.madhaveeragunjeer.com

परंतु शृंगाररसाचा पूर्ण उपभोग घेऊनही माणूस असमाधानीच राहतो हे सांगायलाही भर्तृहरी विसरत नाही. शृंगारशतकाची रचना करताना भर्तृहरीला नीतिमत्ता आणि वैराग्य याचा विसर पडलेला नाही हेच यावरून स्पष्ट होते.

वैराग्यशतकात भर्तृहरीने अनासक्त विरागी जीवनाचे मोठे मनोहर शब्दचित्र रंगवले आहे. मनाला स्थिरता व शांतता लाभावी यासाठी सगुण उपासना व ब्रह्म सत्य हा अनुभव अशी साधना प्रणाली कवीने सांगितली आहे. यातील बहुतांश रचना म्हणजे त्याचे स्वानुभवकथन आहे.

© www.madhaveeraghuveer.com

या शतकातील पहिल्या दहा श्लोकात एक अत्यंत महत्त्वाचा आणि मनुष्यस्वभावाच्या जवळचा विषय मांडला आहे. तो म्हणजे हाव. ही हाव म्हणजे तृष्णा फार वाईट आहे. तृष्णेमुळे माणसाकडून अनेक निंद्य कृत्ये केली जातात. या तृष्णेवर ज्याला संयम ठेवता येतो त्याला ही आशारूपी मायानदी ओलांडता येते. त्याने गरजा कमी केल्या त्याला आपोआपच अपेक्षाभंगाचे दुःखही वाट्याला येत नाही. वाढत्या वयाबरोबर खरं तर ही हाव कमी व्हायला हवी. परंतु प्रत्यक्षात तसे दिसत नाही. म्हातारपणी सर्व इंद्रिये शिथिल होतात. त्यांची शक्ती हळूहळू कमी होते. परंतु तृष्णा? ती तर कमी होण्याचे नावच घेत नाही. उलट ती तरुणच रहाते.

वलिभिर्मुखमाक्रान्तं पलितैरङ्कितं शिरः।
गात्राणि शिथिलायन्ते तृष्णैका तरुणायते ॥९॥

वदना रदनावलिने त्यजिले
शिर सर्व हि शुभ्रपणे पिकले।
उठता बसता अणु शक्ति नसे।
परि आस निरंतर माजतसे ॥९॥

अर्थ - पहा, सुरकुत्यांनी तोंड व्याप्त झाले, तसेच पिकलेल्या केसांनी शिर चिन्हित झाले आणि शरीराचे अवयव शिथिल होत चालले परंतु तृष्णा मात्र दिवसेंदिवस तरुण होत आहे.

स्पष्टीकरण - शरीरातील अवयवांना पुरून उरणारी, त्यांना मागे टाकणारी ही हाव कधीच म्हातारी होत नाही. उलट इंद्रिये व हाव यांचे व्यस्त प्रमाण आहे.

शिथिलायते, तरुणायते - नामधातु (त्वि रूप)

आशा नाम मनुष्याणां ----

आशाया ये दासा -----

साधारणपणे या शंभर श्लोकांचे ढोबळ मानाने दहा भाग केले तर १०-१० श्लोकांमध्ये एक वेगळाच विषय मांडला आहे. पहिल्या दहा श्लोकांमध्ये 'हाव' कशी घातक आहे याचे उत्तम वर्णन केले आहे. त्या मृगजळाप्रमाणे भासणाऱ्या सुखामागे धावत सुटणे म्हणजे स्वतःची निव्वळ फसवणूक आहे. तरीही सर्वसामान्य लोक आयुष्यभर अशा फसव्या सुखामागे धावत सुटतात. परंतु त्यांना खरे सुख मिळते का? नक्कीच नाही, कारण खरे सुख या बाह्य गोष्टींमध्ये नाहीच आहे मुळी! खऱ्या सुखाचा शोध घ्यायचा झाला तर तो आतमध्ये घ्यायला हवा. सुख हे व्यक्तिनिष्ठ नाही, तर आत्मनिष्ठ आहे. ते सोडून माणूस उर फुटेस्तोवर धावत सुटतो. कधीतरी, कुणाला तरी त्यातील वैयर्थ समजून येते. मात्र तोवर फार उशीर झालेला असतो. परंतु याला काही सन्माननीय अपवादही आहेतच. काही योगीपुरुष विषयसुखाकडे पाठ फिरवून आत्मानंद उपभोगतात. त्यांची व सामान्य संसारी जनांची सुखाची कल्पना कशी पराकोटीची भिन्न असते, याचे नेमके चित्रण या श्लोकात केले आहे.

धन्यानां गिरिकन्दरेषु वसतां ज्योतिः परं ध्यायताम्।
आनन्दाश्रुकणान्पिबन्ति शकुना निःशङ्कमङ्केशयाः।
अस्माकं तु मनोरथोपरचितप्रासादवापीतट
क्रीडाकाननकेलिकौतुकजुषामायुः परं क्षीयते॥१४

ध्याती ब्रह्म सदैव धन्य नर ते राहूनिया कंदरी।
त्यांची बाष्पजळे विहंगम पिती बैसोनि मांडिवरी।
एकांती स्वमनोरथेचि रचितो उद्यानवापीगृहे।
क्रीडासौख्यादिक आमुचे सरतसे हा अंत आयुष्य हो।

© www.madhaveeraghuveer.com

कृतकृत्य होऊन पर्वतांच्या गुहेत वास करून परमेश्वराचे ध्यान करणारे असे जे साधु आहेत त्यांचे ईश्वराच्या ठिकाणी मन लागून त्यांना आनंद होतो. त्यामुळे त्यांच्या नेत्रातून अश्रुबिंदू (आनंदाश्रू) पडतात. त्यावेळी नानाप्रकारचे पक्षी निर्भय होत्साते त्यांच्या मांडीवर बसून ते जल प्राशन करतात. याप्रमाणे या योगी पुरुषांचे जीवन व्यतीत होते.

आता आमचे दिवस कसे जातात ते सांगतो. उगीच मनोरथाची कल्पना करावी की मी पुढे चांगला वाडा बांधीन, विहीर बांधीन, पुष्करणी बांधीन आणि क्रीडेकरता बागबगीचे इ० करून त्यात हवी तशी क्रीडा करीन व सुख भोगीन असे चिंतीत बसतो व्यर्थ दिवस जातात.

केवळ मनाच्याच क्रीडा आणि कौतुक करणारे जे आम्ही त्या आमचे आयुष्य मात्र क्षीण होते. ईश्वराचे ध्यान करणारे साधु - त्यांचे जीवन कृतार्थ होते. म्हणून नाशवंत विषयोपभोगाची इच्छा करत रहाणे म्हणजे जीवन व्यर्थ घालवणेच आहे.

© www.madhaveeraghuveer.com

यापुढील तिसऱ्या दशकात कवीने याचक वृत्तीचा धिक्कार केला आहे केवळ पोटाची खळगी भरण्याकरता माणसाला किती हीन दशा भोगावी लागते याची त्याला खंत वाटते आहे. भोग हे अस्थिर व क्षणकाल टिकणारे आहेत. त्यांचे काव्यमय वर्णन कवीने केले आहे.

सर्वच भोग आहेत ते आगमापायिनो ऽनित्या: आहेत असे गीतेत भगवंत म्हणतात. सर्व भोग हे क्षणभंगुर आहेत, येणारे व जाणारे आहेत. आज जी वस्तु, व्यक्ती पदार्थ प्रिय वाटत आहे त्याचा उद्या तिरस्कार वाटू शकतो. मग सुख जर बाह्य गोष्टीत असते तर, ते चिरकाल टिकणारे ठरले असते. परंतु तसे होताना दिसत नाही. तेव्हा सुखाचा शोध घ्यायचाच असेल तर तो निसर्गात घेऊ असे कवी आपल्या प्रियेला म्हणत आहे.

पुष्पमूलफलैः प्रिये प्रणयिनि प्रीतिं कुरुष्वाधुना।
भूशय्या नववल्कलैः करु तृणैरुत्तिष्ठ यामो वनम्॥
क्षुद्राणामविवेकमूढमनसां यत्रेश्वराणां सदा।
वित्तव्याधिविकारविह्वलगिरां नामापि न श्रूयते॥२५॥

मेसू तुम्ही कंदफळांचे खाऊ
शय्या मही चाल वनासी जाऊ।
तेथे पहा क्षुद्र धनेश्वराची
वार्ता न कानी पडणार साची॥२५॥

अर्थ- हे प्रियतमे, आजपर्यंत लोकांचे आर्जव झाले इतके पुरे. आता पवित्र अशा फलमूलादिकांनी संतोष पावून नूतन वल्कल धारण करून भूमी हीच शय्या कर, तर हे प्रिये आपण अशा वनात जाऊ की जिथे गेले असता संपत्तिरूप रोगाच्या विकारामुळे ज्यांच्या वाणी व्याकुळ झाल्या आहेत अशा धनिकांचे



©www.madhaveeraghuveer.com

MONDAY

JAN '14

13

013-352 WK-03

नावही कानी पडणार नाही अशा ठिकाणी जाऊन राहू.

© www.madhaveeraghuveer.com

| JAN | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2014 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

मानवी जीवनातील प्रत्येक गोष्टीला व सुखाला कशाचे तरी ग्रहण लागलेले आहे. मानवी जीवनसुद्धा कधी तरी संपणारे आहे. मृत्यु अटळ आहे. मृत्युची भीती तर प्रत्येक जीवाला आहेच आहे. परंतु या सृष्टीचक्रातील प्रत्येक गोष्टीला दुसरी गोष्ट मर्यादा घालते. याचाच अर्थ प्रत्येक गोष्ट करताना कशाची तरी भीती वाटत असते. शेळीला वाघाची भीती वाटते वाघाला शिकाऱ्याची भीती आहे. शिकाऱ्याला जंगलातील साप-नागाची भीती आहे. या जगात भीतीपासून मुक्त असा एकही जीव नाही. प्रत्येकजण कशाला तरी भिऊनच वागत असतो.

भय इथले संपत नाही अशी इथली स्थिती आहे. अगदी हत्तीपासून मुंगीपर्यंत, उधळणाऱ्या अश्वास्वार घोड्यापासून संथ अशा गोगलगाईपर्यंत प्रत्येकाला कशाचे ना कशाचे भय असतेच.

आहार निद्रा भय मैथुनं च
सामान्यमेतत् पशुभिर्नराणाम्।

आहार, निद्रा भय आणि मैथुन या चार गोष्टी सर्व जीवमात्रांमध्ये असतातच. त्या सहजप्रेरणा आहेत. त्यासाठी वेगळा विचार, वेगळे प्रयत्न करावे लागत नाहीत. आपोआप या गोष्टी घडत असतात. माणसाच्या बाबतीत मात्र तीन गोष्टी वयोमानानुसार थोड्या कमी होऊ शकतात. परंतु भय मात्र शेवटपर्यंत पाठ सोडत नाही.

कुणाकुणाला कशाकशापासून भय असते आणि अभय कशामध्ये आहे याचे वर्णन भर्तृहरी करतो —

भोगे रोगभयं कुले च्युतिभयं वित्ते नृपालाद् भयम्।
मौने दैन्यभयं बले रिपुभयं रूपे जराया भयम्।
शास्त्रे वादभयं गुणे खलभयं काये कृतान्ताद् भयम्।
सर्वं वस्तु भयान्वितं भुवि नृणां वैराग्यमेवाभयम्।



© www.madhaveeradhupveer.com

भोगा रोगाभीती कुला च्युतभीती वित्ता नृपाची भीती।
मौना दैन्यभीती बला रिपुभीती रूपा जरेची भीती।
शास्त्रा वादभीती गुणा खलभीती देहा यमाचे भया।
वैराग्याविण भूतली सकलही वस्तूस आहे भय ॥२१॥

© www.madhaveeraghuveer.com

हा देह कधीतरी निश्चितपणे जाणार आहे
हे सत्य आहे. मृत्यु अटळ आहे याची प्रत्येकाला
कल्पना आहे. माणूस रोज अनेक मृत्यु पहात
असतो. आप्त-स्वकीय, परिचित, मित्र, शेजारी
यांचे मृत्यु पाहूनसुध्दा तो जागा होत नाही. तो
भ्रमात वावरत असतो. मी जणू काही कायमचा इथेच
रहाणार आहे अशी त्याची जणू खात्रीच असते. आपले
आयुष्य हे क्षणाक्षणाने संपत आहे याचीहि कल्पना
असते पण तरीसुध्दा आपले खरे हित कशात
आहे हे तो जाणून घेण्याचा प्रयत्नही करत नाही
आणि जरी जाणून घेतले, त्याला कळले तरी वळत
नाही. बालपण खेळण्यात संपून जाते. तरुणपणी तर
विषयोपभोगाची आकर्षणे असतात. धन कमवायचे
असते. संसाराची चिंता असते. आणि म्हातारपणी तर
विचारायलाच नको. तेव्हा परमेश्वराकडे वळावेसे वाटते.
परंतु तेव्हा शरीर साथ देत नाही. आणि तरीही लोक
जागे होत नाही आपल्या हिताचा विचार करत नाहीत.
दुसऱ्यांना 'लागल्या ठेचांवरून स्वतः शहाणे होत नाहीत
आपले अकल्याण कशात आहे हे त्यांना माहित असून
निर्भयपणे ते अहितच आचरतात याबद्दल येथे
भर्तृहरीने आश्चर्य व्यक्त केले आहे.

व्याघ्रीव तिष्ठति जरा परितर्जयन्ती
रोगाश्च शत्रव इव प्रहरन्ति देहम् ।
आयुः परिस्रवति भिन्नघटादिवाम्भो
लोकस्तथाप्यहितमाचरतीति चित्रम् ॥३६॥

व्याघ्रीपरी भय करीत उभी जरा रे
देहासी रोग करिती रिपुतुल्य सारे
आयुष्य भिन्नघटनीर सरे तसे हे
पापे तथापि जन आचरताति पाहे ॥३६॥

जरा (वृद्धावस्था) वाघिणीसारखी पुढे येऊन
भेडसावीत आहे. रोग शत्रूप्रमाणे नेहमी
देहावर प्रहार करीतच आहेत व आयुष्य तर
फुटक्या घड्यातील उदकाप्रमाणे सारखे
पाझरत आहे, असे असताना हे लोक निर्भयपणे
अहित आचरतात हे मोठे आश्चर्य आहे.

© www.madhaveeraghuveer.com

या कालाचा महिमा अगाध आहे. काळ हा क्षणाक्षणाने पुढे सरकत असतो. त्याच्या उदरात अनेक राजसत्ता, मोठमोठी साम्राज्ये गडप होतात. तरीसुद्धा माणसाला त्याविषयी आकर्षण वाटत असते. त्यासाठी तो नाना प्रकारच्या खटपटी, लटपटी करतो. परंतु हा सर्व खटाटोप व्यर्थच जाणार आहे.

मात्र जो विरागी वृत्तीचा योगी आहे त्याला हे सर्व तृणवत वाटते. या सर्व अशाश्वत गोष्टी आहेत हे तो यथार्थपणे जाणतो. त्यामुळे अगदी ब्रह्म, इंद्र आणि मरुद्गण याविषयीसुद्धा तो उदासीन असतो. ब्रह्मज्ञानरूपी बोधापुढे, त्याच्या प्रकाशापुढे इतर सर्व क्षणभंगुर गोष्टी निस्तेज ठरतात. म्हणून अशा नाशिवंत गोष्टीत आसक्त होऊ नकोस.

सा रम्या नगरी महान स नृपतिः सामन्तचक्रं च तत्
पार्श्वे तस्य च सा विदग्धपरिषत्ताश्चन्द्रबिम्बाननाः।
उन्मत्तः स च राजपुत्रनिवहस्ते बन्दिनस्ताः कथाः।
सर्वं यस्य वशादगात्स्मृतिपथं कालाय तस्मै नमः॥

गेला तो नृप ते प्रधान अवघे ती पंडितांची सभा
गेली ती नगरी तशा शशिमुखी त्या तप्तहेमप्रभा
गेला तो नृपपुत्र त्या शुभकथा त्या दोर्विके सर्वही
ते जे जे स्मरणास योग्य रचिले काळासि त्या वंदिजे।

ती रम्य नगरी, तो मोठा राजा, ते मांडलिक राजांचे मंडळ, त्याच्या पार्श्वभागी असलेली ती विद्वानांची सभा, त्या चंद्रमुखी सुंदर स्त्रिया, तो बलिष्ठ राजपुत्रांचा समुदाय, तसेच ते स्तुती करणारे भाट आणि त्या अनेक प्रकारच्या उत्तम कथा हे सर्वही ज्याच्या प्रभावामुळे नाहीसे होऊन

© www.madhavaveeraghuveer.com

SUNDAY

JAN '14

# 19

019-346 WK-03

केवळ आमच्या स्मृतिकोषात शिल्लक राहिले आहे असा जो काळ त्याला वंदन असो.

© www.madhaveeraghuveer.com

| JAN | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2014 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

केवळ राजेरजवाड्यांच्याच बाबतीत हा कालाचा महिमा दिसून येतो असे नाही तर अगदी सर्वसामान्य लोकांच्या बाबतीत असेच चित्र दिसते. त्यासाठी फार मोठा कालखंड जावा लागतो असेही नाही, तर माणसाच्या एका आयुष्यात दैवाची विचित्र लीला पहावी लागते. इथेच रंकाचा रावही होतो आणि रावाचा रंकही होतो. जिथे लोकांची गजबज होती, सणवार साजरे केले जायचे, पाहुणे-रावळे, नोकर-चाकर, गाई गुरे यांनी भरलेला संपन्न वाडे काही काळाने ओस पडलेला पाहून दुःख होते. परंतु वस्तुस्थिती अशीच आहे. आणि याच्या अगदी उलट एखादा सामान्य परिस्थितीतला शाळकरी मुलगा आपल्या उद्यमशीलतेच्या जोरावर फार मोठा व्यावसायिकही होऊ शकतो. त्याने स्वतः सुद्धा कधी कल्पनाही न केलेले साम्राज्य तो उभा करतो. यात त्याचे कष्ट तर आहेतच हे नक्की पण ही कालाची करणी आहे. कालाचा हा घडवण्याचा व बिघडवण्याचा खेळ अव्याहतपणे सुरुच आहे. सामान्य माणसांना मात्र तो अगम्यच वाटतो.

यत्रानेकः क्वचिदपि गृहे तत्र तिष्ठत्यथैको
यत्राप्येकस्तदनु बहवस्तत्र नैकोऽपि चान्ते ।
इत्थं चेमौ रजनिदिवसौ दोलयन् द्वाविवाक्षौ
कालः काल्या भुवनफलके क्रीडति प्राणिसारैः ॥४०

जेथे एक अनेक तेथ मिळती स्वात्या तयांच्या त्रुटी ।
होता एक नुरे सवेच मरती तेही नुरे शेवटी ।
फासे रात्रदिनाख्य खेळत पहा तो काळ खेळ असा ।
प्राण्यांचीच करोनिया भवगृही ने सोंगटी चौरसा ॥४०॥

© www.madhaveeraghuveer.com

TUESDAY

JAN '14

21

021-344 WK-04

ज्या वाड्यात पूर्वी पुष्कळांची वस्ती होती
तेथे कालकरून एखादाच उरतो. तसेच
ज्यात एखाद दुसराच असतो त्यात कदाचित
पुष्कळ गर्दीही दृष्टीस पडते. बरे शेवटी
पहावे तो गर्दीचा मागमूसही उरत नाही. तेव्हा
सोंगट्या जशा एका पटावर पुष्कळ जमतात पुन्हा
विस्कटतात व शेवटी तेथे एकही रहात नाही,
त्याचप्रमाणे दिवस आणि रात्री हेच दोन फासे
टाकत या जगतीपटावर प्राण्यांच्या सोंगट्या करून
कालासह वर्तमान काळ खेळत आहे.

| JAN | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2014 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 |

© www.madhaveeraghuveer.com

हा काळाचा महिमा जाणला आणि खरोखर आपल्या हितासाठी काही करायचे माणसाने मनोमन ठरवले तरी सुद्धा ते जमत नाही. मनापासून ठरवलेल्या सगळ्याच गोष्टी सिद्धीलाही जात नाही. कारण आयुष्य मर्यादित आहे आणि किती आहे ते निश्चित माहीत नाही आणि जे व जेवढे आयुष्य आहे त्यातील किती काळ व्यर्थ जातो आणि किती हाताशी लागतो आणि त्यापैकी आपण किती सार्थकी लावतो, असा विचार जर करायला लागलो, आपल्या आयुष्याचे गणित जर मांडायला लागलो तर शेवटी हाती काहीच लागत नाही. हातातील वाळूप्रमाणे आयुष्य झरझर निसटून जाते. हे जेव्हा लक्षात येते तेव्हा फारच उशीर झालेला असतो. हा संसार दुःखमयच आहे. सुखाचे फारच थोडे क्षण वाट्याला येतात.

आयुर्वर्षशतं नृणां परिमितं रात्रौ तदर्धं गतम् ।
तस्यार्धस्य परस्य चार्धमपरं बालत्ववृद्धत्वयोः ।
शेषं व्याधिवियोगदुःखसहितं सेवादिभिर्नीयते ।
जीवे वारितरङ्गचञ्चलतरे सौख्यं कुतः प्राणिनाम् ॥

आयुष्य वर्षशत त्यात निमे निजेले ।
त्याही निमेतहि निमे दिन बाद झाले ।
वार्धक्य शैशवपणे उरले वियोगी ।
दुःखामध्येचि सरले सुख काय सांगे ॥४७॥

मनुष्याच्या आयुष्याची मर्यादा म्हणजे शंभर वर्षे! त्यातून निम्मे आयुष्य तर रात्रीतच गेले. बाकी राहिलेल्या अर्ध्यापैकी अर्धे अधिक बाल्य व वृद्धत्व यात गेले. आता बाकी (२५ वर्षे) राहिले ते नाना प्रकारचे रोग, विरह, संकटे आणि दुसऱ्याची सेवा यात

| FEB | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | ♦ | ♦ | ♦ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2014 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | ♦ | ♦ | ♦ |

© www.madhaveeraghuveer.com

जाते. तस्मात उदकाच्या लहरीप्रमाणे परम
चंचल असे जे जीवित त्यात प्राण्यास
सौख्य कुठून मिळणार ?

सुखाच्या मागे कितीही धावले तरी सुख काही हाती लागत नाही कारण खरे तर त्यात सुख नसतेच. आपण ज्याला सुख सुख म्हणतो ती सुखाची साधने आहेत. ते साध्य नाही. आणि साधने सतत बदलत असतात. व्यक्ती, वस्तू आणि पदार्थ हे कधीच नित्य सुखदायक असत नाहीत. जो पदार्थ काल खूप आवडत होता तो आज आवडेलच असे नाही. काल जी वस्तू सोयीची वाटत होती त्यापेक्षा अधिक चांगली वस्तू बाजारात आली की ती कालबाह्य, गैरसोयीची ठरते. माणसे तर दररोज नवीन भेटत असतात. जुन्यांची नाराजूर होत असते. त्यामुळे कोणत्यातरी एका व्यक्तीवर सुख अवलंबून रहात नाही. मात्र संतोष जो आहे तो आतमध्येच असतो. समाधान हे अंतर्मनात असते. आणि बाह्य गोष्टी बदलल्या तरी समाधान कायम रहाते हे सांगणारे काही श्लोक या शतकात आहेत. एक निःस्पृह योगी पुरुष एका संपन्न राजाला हे सांगत आहे.

वयमिह परितुष्टा वल्कलैस्त्वं दुकूलैः।
सम इह परितोषो निर्विशेषो विशेषः।
स तु भवति दरिद्रो यस्य तृष्णा विशाला।
मनसि च परितुष्टे कोऽर्थवान् को दरिद्रः॥५०

लक्ष्मीने जरि तुष्ट तू बहु सुखी मी वल्कलाने असे।
दोघांचा परितोष तुल्य असता आधिक्य काही नसे।
आशा ज्यास दरिद्र तोचि समजे नैराश्य पै बाणता।
भाग्याचा नर कोणता मग, बरे निर्भाग्य तो कोणता।

| FEB | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | Sa | Su | Mo | Tu | We | Th | Fr | ♦ | ♦ | ♦ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2014 | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | ♦ | ♦ | ♦ |

हे राजा, आम्ही जसे वल्कलांनी संतुष्ट आहोत तसाच तू मोठ्या भरजरी वस्त्रांनी संतुष्ट आहेस म्हणजे संतोष हा दोघांचाही सारखाच आहे. त्यात काही भेद नाही. तेव्हा आम्हीही तुझ्यासारखेच श्रीमंत आहोत आता दरिद्री कोण? तर ज्याला लोभ फार, तोच दरिद्री! यदृच्छेने मिळालेल्या वस्तूवर जर मन संतुष्ट असेल तर मग श्रीमंत कोण व दरिद्री कोण?

© www.madhaveeraghuveer.com

समाधान हे बाह्य साधनांवर अवलंबून असते. ते आत असते. ते कोणीही हिरावून घेत नाही. त्यामुळे जो संतुष्ट आहे तोच श्रीमंत असतो. आणि जो भौतिक संपत्तीने समृद्ध आहे परंतु त्याच्या अंतःकरणात जर तृष्णा असेल, हाव, लालसा असेल तर त्याच्या वैभवाला काहीच किंमत नाही. तो दरिद्रीच समजावा. आणि ज्याच्याजवळ संतोषरूपी धन आहे तो अतिशय श्रीमंत समजावा. माणसाची तहान ही बाह्य उपकरणांनी वैभवाने भागत नाही उलट ती जास्तच वाढत जाते. याविषयी शंकराचार्य ही म्हणतात

कौपीनवन्तः खलु भाग्यवन्तः।

ज्यांच्याजवळ भाराभार कपडे असतात त्यांनाच कोणत्या प्रसंगी काय घालावे याची चिंता असते मात्र जे योगी पुरुष केवळ लंगोटी धारण करतात त्यांना काळजी करावी लागतच नाही. ते संतुष्ट असतात

अश्नीमहि वयं भिक्षामाशावासो वसीमहि।
शयीमहि महीपृष्ठे कुर्वीमहि किमीश्वरैः॥५६॥

खाऊनि राहू सुखरूप भिक्षा।
करू दिशा वस्त्र पहा परीक्षा।
निजू सुखे भूमितळीच शेजे।
भूपाळ त्या सेवुनि काय कीजे॥५६॥

आम्ही भिक्षान्न खाऊन निर्वाह करू; तसेच दिशारूपी वस्त्रे नेसू म्हणजे नग्न राहू. व जमिनीवर शयन करू. आम्हास या द्रव्यवान लोकांशी काय करायचे आहे?